# पंचधारा

जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२२
वर्ष : ६५ अंक दुसरा

## शंकर रामाणी विशेषांक



RNI Reg. No. 32307/79
मूल्य : ९५/-
मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य हैदराबाद

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## शंकर रामाणी विशेषांक

वर्ष ६५ वे, अंक दुसरा
जुलै ते सप्टेंबर २०२२
आषाढ श्रावण भाद्रपद १९४४

### संपादक मंडळ

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
डॉ. शोभा देशमुख
डॉ. गीता काटे
प्रा. मीना जागीरदार
श्रीमती विद्या मक्तल
श्री. माधव रामराजे चौसाळकर

### अतिथी संपादक

डॉ. अनुजा जोशी

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**दूरध्वनी** : (०४०) २४६५५७०६३, **भ्रमणध्वनी** : ७८४२८५३९८४

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क** – म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षाची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
(For both accounts)
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. २००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. ५००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. २,०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती

या अंकाचे मूल्य : रु. ९५/-

टपाल खर्च : रु. ३५/-

मुखपृष्ठ : महेश वेंगुर्लेकर, गोवा. फोन : ९८२२४००८८८

ॲक्रेलिक चित्रे : दिलेश हजारे, गोवा. फोन : ८८०६४५२३७५

अक्षरजुळणी : अमोघ आर्ट्स,पुणे. फोन : ९३२६०८६२८५

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखांशी, विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रमणिका

संपादकीय ........................................................ ५

१. समकालीन वेधाचा सुंदर प्रवास
डॉ. अनुजा जोशी ........................................................ ७

२. जाणीव-नेणिवेच्या आभाळवाटांचा आर्तोत्सव
(शंकर रामाणी-काव्यशैली)
आश्लेषा महाजन ........................................................ १४

३. शंकर रामाणी यांची कविता
मंगेश नारायणराव काळे ........................................................ २३

४. शंकर रामाणी यांच्या कवितेतील ऋतुसंवेदन आणि गूढगुंजन
सुनील शिनखेडे ........................................................ २९

५. शंकर रामाणींच्या कवितेतील 'प्रेमभावना' -
एक सर्जक चकवा
अरुण म्हात्रे ........................................................ ३८

६. शंकर रामाणी यांची निसर्गकविता
प्रा. विनायक लक्ष्मण बापट ........................................................ ५१

७. 'कवी तळ ढवळतो तेव्हा....'
श्रीकांत देशमुख ........................................................ ६१

८. रामाणी यांच्या चिमण्यांचे पुनश्च सहर्ष स्वागत
अविनाश साळापुरीकर ........................................................ ६६

पुस्तक परिचय :


१. बालमनाला मोहवणारी काव्यरूप 'सूर्यफुले'
स्नेहा अमोल मोरजकर ........ ७१

२. शंकर रामाणींचे भावविश्व व्यक्त करणारी 'कातरवेळ'
पूर्वा पंडित वस्त ........ ७५

३. 'आभाळवाटा' या काव्यसंग्रहाचा विवेचनात्मक परामर्श
डॉ. विनय मडगांवकर ........ ८६

४. विविधांगी रूपांनी नटलेला 'पालाण'
स्नेहा संभाजी जांबोटकर ........ ९७

५. गूढगर्भी कवितेचा आविष्कार 'दर्पणीचे दीप'
प्रा. चिन्मय मधू घैसास ........ १०४

६. मनाच्या गाभ्यातून - 'गर्भागार'
राधिका रा. नागवेकर ........ १०९


ग्रंथ परीक्षण :


१. साधार, सप्रमाण, संदर्भमूल्ययुक्त दस्तऐवज
डॉ. सोमनाथ कोमरपंत ........ ११६

२. पत्रांच्या सोबतीने गायलेले 'एकट्याचे गाणे'
डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी ........ ११९

३. "रामाणी": शंकर रामाणी नावाच्या गूढाचा वेध
प्रा. अरुणा गानू ........ १२४

लेखक परिचय ........ १२८

स्वागत नव्या पुस्तकांचे ........ १३२

पुस्तक परिचय : ५

# गूढगर्भी कवितेचा आविष्कार 'दर्पणीचे दीप'



प्रा. चिन्मय मधू घैसास

शंकर रामाणी हे गोमंतकातील एक महत्त्वाचे कवी. रामाणी यांची कविता ही संतरचनांचा गाढा प्रभाव असलेली. कवितेचा आशय आणि शब्दकळा या संदर्भात त्यांच्या कवितेवर असलेला संतसाहित्याचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. 'सूर्यफुले' (१९४९), 'कातरवेळ' (१९५९), 'आभाळवाटा' (१९६७), 'पालाण' (१९७९) हे कवितासंग्रह तर 'ऊर्मिला' हे दीर्घकाव्य त्यांनी लिहिले आहे. याच परंपरेतील त्यांचा पुढील महत्त्वाचा कवितासंग्रह म्हणजे 'दर्पणीचे दीप'. १९९२ साली 'मौज' प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या काव्यसंग्रहास गोमंतक मराठी अकादमीचा कृष्णदास शामा पुरस्कार आणि महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. ज्ञानेश्वरी, संत तुकारामांचे अभंग, संत रामदासांच्या रचना, संत एकनाथांचे लेखन या सर्वांचा प्रभाव रामाणींच्या कवितेवर दिसून येतो. त्याचप्रमाणे बा. सी. मर्ढेकर आणि पु. शि. रेगे यांच्या कवितांचाही प्रभाव रामाणींच्या काव्यलेखनावर झालेला दिसून येतो. नव्याजुन्याची सांगड घालत केलेला भाषेचा वापर हा गुण रामाणींनी मर्ढेकरांच्या प्रभावातून घेतलेला दिसतो तर शारीर प्रेम आणि आध्यात्म या दोन्ही पातळ्यांवर एकाच वेळी कसे राहावे याचा बोध त्यांना रेग्यांच्या कवितेतून झाला असे म्हणता येते.

## 'दर्पणीचे दीप'चे विषय

रामाणींनी आपल्या 'दर्पणीचे दीप' या काव्यसंग्रहात वेगवेगळे विषय हाताळलेले दिसून येतात मात्र तरीही त्यात काही विषय त्यांच्या विशेष आवडीचे, स्नेहाचे असावेत. एकाकीपणा, निवृत्ती, प्रेम, भक्ती, उजेड-अंधःकार, सुख-दुःख, निसर्ग यांसारखे विविध विषय त्यांच्या लेखनात दिसतात. रामाणींच्या या काव्यसंग्रहातील कवितांचे विषय हे वरकरणी बाह्य स्वरूपाचे वाटत असले तरी मानवी मनावर खोलवर त्यांचा काय परिणाम होतो हे सांगण्याचा प्रयत्न कवीने या कवितांतून केला आहे. 'दर्पणीचे दीप' मधील काही प्रातिनिधिक कवितांचा विचार

करता या काव्यसंग्रहातील विषयांचे वैविध्य आणि त्यामागील विचार लक्षात घेता येऊ शकतो.

जीवनातील सर्व नश्वर गोष्टी एके दिवशी कशा उडून जातात आणि अखेरीस कवीमनाच्या सोबतीला त्याचे काव्यच कसे आधाराला मागे राहते हे 'कविता' या रचनेतून दिसते

*नंतर मी कुठेच नसतो, पाखरेही उडून जातात सैरभैर*
*केवळ उरते ती कविता, अदृष्टाचा झुला बांधून*
*उंचच उंच झोके घेणारी, निमूटपणे*

निसर्गातील सर्जनाचे वर्णन 'उन्हाचे आरसे झाले', 'ओसरत्या भाद्रपदात', 'दूर डोंगरात', 'सर' या कवितांतून ते करतात. निसर्गातील सर्जनाविषयीची एक कमालीची उत्सुकता आणि कुतुहल त्यांच्या मनाला भावताना दिसते.

*ओसरत्या भाद्रपदात पेटलेल्या रक्तासारखा गुल्मोहर*
*मावळतीला, आणि उगवत्या संधिप्रकाशात*
*मला नावरलेले एकाएकी झेपावणारे रावे*
*थेट झाडाच्या दिशेने*

अशा ओळींतून जीवनाच्या अखेरच्या क्षणांत मोक्षप्राप्तीची कल्पना कवी मांडतात.

'कविता आकळण्याची वेळ', 'डोळ्यांनी फेडिला', 'कवी', 'केशवसुत' या कवितांतून ते आपल्या काव्यप्रवासाचे वर्णन करतात. एखाद्या कवीला काव्यनिर्मिती करताना येणारा अनुभव या रचनांतून ते मांडतात.

'आई', 'सांज', 'वळण', 'पांघरूण', 'कवड मिटून घेता', 'पेन्शनर', 'निखळ प्रकाशाच्या प्रवाहात', 'धूळ', 'उजेडले तरी', 'पाश', 'प्रकाशाचा पहिला बहर', 'मध्यरात्र', 'पाखरू', 'परद्वार', 'पालखी', 'आषाढ', 'आरसा', 'दीप', 'या आतल्या उजेडी', 'हिवाळा', 'पेणे', 'सावल्यांचे ऊन्ह', 'आता कोठुन मोर', 'तो', 'पाप' यासारख्या कवितांतून मानवी जीवनाविषयीचे गंभीर भाष्य ते करतात.

*देहात सांज सजली, माझा तुटेल पान्हा*
*अजुनी न जाग आली पैलाडच्या दिव्यांना*

असे म्हणत, माणसाचे जीवन हे क्षणभंगूर आहे आणि जेव्हा मानवाला त्याचा अंत समोर दिसू लागतो त्यावेळी त्याच्या डोळ्यांसमोर त्याचा आजवरचा प्रवास कसा तरळतो, त्या गतकाळाची आठवण करता माणूस कसा भावूक होतो आणि जीवनात आपण केलेल्या सर्व बऱ्यावाईट गोष्टींची जाणीव मानवाला कशी होऊ लागते याचे दर्शन या कवितांतून घडते.

*नि मी तंद्रावलेल्या डोळ्यांनी न्याहाळतोय माझे सर्वस्व व्यापून*
*आषाढ कवेत घेणारा बहादर बरसतीचा क्षण*
*उन्हाळी घाटाच्या अंतापर्यंत*

या शब्दांत भयाण, दिशाहीन आणि उदासीन अशा एका कालखंडानंतर मानवाला एक नवी वाट, दिशा, आशा खुणावत राहते याचा प्रत्यय या कवितांतून येतो.

या कविता फक्त मानवी जीवनाचे गंभीर भाष्यच करत नाहीत तर आध्यात्मिक दृष्टीकोनही देतात. जीवनाची नश्वरता आणि क्षणभंगुरतेची ते वाचकांना आठवण करून देतात.

रामाणींच्या कवितांतील आध्यात्म मृत्यूनंतरच्या एका वेगळ्या जगाचा विचार करायला भाग पाडते. भौतिक अस्तित्त्वाच्या पलीकडील जगाची कल्पना कवी रामाणी करतात. उतारवयात मानवाला येणारा अशक्तपणा आणि त्यायोगे पुढल्या वाटचालीत होणारा त्रास याचे चित्रणही त्यांच्या कवितांत दिसते. म्हातारपण, दुःख, निराशा, औदासिन्य यांच्यामुळे मानवी जीवन कसे अंधकारमय भासते याचा प्रत्यय त्यांच्या कवितांतून येतो. विविध ऋतुंचे वर्णन करताना कवीने शब्दार्थाने एखाद्या विशिष्ट काळाचे वर्णन केले असले तरी त्यामागे मानवी जीवनातील बऱ्यावाईट प्रसंगांचा, परिस्थितीचा अदृश्य उल्लेख आहे. उन्हाळा, पावसाळा यासारखे ऋतूदर्शक शब्द जीवनातील दुःख, विवंचना, सर्जन यांसारखे गुण दाखवतात. जीवनाच्या अंतिम समयी माणसाला खुणावणारा एक अव्यक्त, अस्पष्ट उजेड याचेही चित्रण त्यांच्या कवितेत दिसते. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात माणसाच्या डोळ्यांसमोरून एकूण जीवनपट तरळत असतो अशी कल्पना करत आजवरच्या या प्रवासात आपण केलेली बरीवाईट कृत्ये, आपल्याला आलेले अनुभव आणि सभोवतालची एकूण परिस्थिती यांच्या पार्श्वभूमीवर माणूस पुढल्या प्रवासाची कल्पना करतो हा विचार कवी सांगू पाहतात. परंतु असे असले तरी त्यांच्या कवितांतून एक आशावादही प्रकर्षाने जाणवतो. 'हिवाळा' या कवितेत 'आता हळू हळू गर्दबहार हिवाळा सुरु होईल' असे म्हणत एका नव्या सुंदर सुरुवातीने होणाऱ्या आनंदाची चाहूल ते दर्शवतात.

'अशी सजवीन तुला', 'संग', 'कविता एका अनोळखी पहाटेची', 'बिंब', 'आई', 'मोर', 'अवेळाची पोर', 'कविता केळपानाच्या' यासारख्या कवितांतून ते मानवी मनातील प्रेमभावना व्यक्त करतात. मनुष्याच्या जीवनातील विविध स्तरांवरील प्रेमाची जाणीव कवी या कवितांतून करून देतात. मानवी मनात निर्माण होणारी प्रेमभावना वेगवेगळ्या स्तरांतून आणि प्रसंगी कशी उफाळून येते त्याचे चित्रण त्यांच्या या कवितांत पाहावयास मिळते. निसर्गातील वेगवेगळ्या प्रतिमांचा वापर अत्यंत सुंदर पद्धतीने करत त्यांनी मानवी

स्वभावातील बारकावे दाखवले आहेत. काळानुरूप तसेच वयानुरूप मानवी जीवनात होणारे बदल निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून कवी सांगण्याचा प्रयत्न करतात.

या सर्वांबरोबरच आपल्या आदर्श कवींचा आणि त्यांच्याविषयीच्या आदराचा उल्लेख देखील ते आपल्या कवितांतून करतात. 'आठ जुलै १९९१' या कवितेद्वारे त्यांनी बा. भ. बोरकर यांच्याविषयीचा आपला आदरभाव व्यक्त केला आहे. 'जी. ए. कुलकर्णी : एक अस्त' या कवितेद्वारे जी. ए. कुलकर्णी यांच्या जीवनाचा परामर्श ते घेतात. 'व्हिन्सेन्ट व्हॅन गॉफ' या कवितेतून त्यांनी व्हिन्सेन्ट व्हॅन गॉफच्या जीवनाला आणि साहित्यप्रतिभेला आदरांजली अर्पण केली आहे. आपल्या विचारांवर, लेखनावर ज्यांचा प्रभाव आहे त्या साहित्यिकांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करणे कवीला आपले कर्तव्य वाटते.

### 'दर्पणीचे दीप'ची भाषाशैली

रामाणींच्या 'दर्पणीचे दीप' कवितासंग्रहातील भाषाशैली गूढ अर्थाची आहे. त्यांच्या कवितांतून व्यक्त झालेली कल्पना सरळ अर्थाने येत नाही तर त्यामागे एक वेगळाच गूढ आणि गहन विचार दडलेला असतो. शब्दार्थापेक्षाही लक्ष्यार्थाने त्या शब्दाचा, वाक्याचा, रचनेचा विचार करावा लागतो. त्यांच्या कवितांत त्यांनी झाडे, पशु, पक्षी, ऋतु, आकाश, अवकाश, सूर्य, चंद्र, समुद्र, लाटा, माती, आग अशा विविध नैसर्गिक प्रतिमांचा वापर केला आहे. या प्रत्येक प्रतिमेच्या वापरातून कवी वेगवेगळ्या मानवी भावना आणि संवेदना दाखवू पाहतात. रामाणींनी वापरलेल्या वेगवेगळ्या शब्दालंकारांतून या प्रतिमांचे वैशिष्ट्यही ठळकपणे उद्धृत होते. 'पेटलेल्या रक्तासारखा गुलमोहर' या शब्दांतून गुलमोहराचा लालबुंदपणा डोळ्यांसमोर स्पष्ट उभा राहतो. 'खोल कोजळासारखा माजघरात अंधार' असे म्हणताना काळोखाची एक वेगळीच छटा वाचकांच्या नजरेसमोर येते. वेगवेगळ्या वर्णनांत त्यांनी वापरलेली विशेषणे त्या-त्या शब्दाला, कल्पनेला, वर्णनाला वेगळाच बहार आणतात. 'साहेबाचे मुर्दाड मुस्काट एखाद्या नवलकथेतल्या विराट राक्षसासारखे' म्हणताना त्या साहेबाच्या स्वभावातील क्रूरपणा आणि असंवेदनशीलता वाचकाला जाणवते. आवश्यक त्या ठिकाणी ते इंग्रजी भाषेतील शब्दांचाही वापर करतात. पेन्शनर, ऑपरेशन थिएटर, कॅटरेक्ट, सर्जन, वॉर्ड असे शब्द त्या परिस्थितीचे आणि संदर्भाचे यथार्थ दर्शन घडवतात. अमराठी असूनही असे शब्द त्या-त्या ओळीचा नेमकेपणाने अर्थ उलगडून दाखवतात. काळोख, उजेड, बीज, गर्भारपण, जन्म यासारख्या प्रतिमा त्यांच्या कवितांत वारंवार येताना दिसतात.

## समारोप

शंकर रामाणी यांच्या 'दर्पणीचे दीप' कवितासंग्रहातील कविता ही विविधांगी आहे. त्यांच्या कवितेला कोणत्याही विषयाचे वावडे नाही. प्रत्येक विषय त्यांनी फार समर्थपणे हाताळलेला दिसतो. आपल्या अंतर्मनाचे प्रभावी प्रकटीकरण रामाणी आपल्या कवितेतून करतात. आपले मन आणि भावना या विषयी रामाणी फार आत्मीयतेने विचार करतात. पूर्वसुरींचा विचार, कल्पना, भारतीय आध्यात्म, तत्त्वज्ञान यांच्याविषयी देखील त्यांच्या मनात फार आदर आहे. त्याचाच संदर्भ देत ते निवृत्ती, मोक्ष या सारख्या संकल्पनांशी संबंध जोडताना दिसतात. जीवनाचे अल्पकालत्व त्यांनी मान्य केलेले दिसते आणि त्याच्याही पुढे जाऊन या जीवनाच्या पल्याड असणाऱ्या दिव्य आणि गूढ प्रवासाची ओढ, कुतुहल आणि जिज्ञासा त्यांच्या कवितांतून प्रकट होते. आईच्या निधनाचा संदर्भ देणारी कविता व्यक्त करताना आई मातीत मिसळून गेली आणि त्याचवेळी आकाशातही विलीन होऊन गेली असे म्हणताना मानवी शरीर आणि पंचतत्वे यांचा सुंदर परंतु प्रभावी प्रत्यय ते करून देतात. जीवन हे रूक्ष, दुःखदायक, अंधारमय असले तरी देखील एक नवी पहाट, नवी आशा, नवा उजेड मानवाच्या जीवनात येईलच अशी सकारात्मकता देखील रामाणींच्या कवितेत आहे. त्यांची कविता वास्तववादी असण्याबरोबरच आशेच्या जगात रमणारी देखील आहे. निसर्गाचे शोकमग्न रूप, जीवनाची गूढता त्यांच्या कवितेत दिसते. त्यांच्या कवितेत औदासिन्य आणि निराशा खूप मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते परंतु त्यांच्या आजूबाजूच्या मानवी आयुष्याचे भयाण वास्तव त्यांच्या कवितेतून प्रकट झाले आहे असे म्हणता येते. रामाणींच्या कवितेत स्वतःचे असे काहीसे गूढ आणि अज्ञाताची वाट शोधणारे भावविश्व दिसून येते. निसर्गानुभूतीचे सौकुमार्य रामाणींच्या शब्दकळेत आढळते. अंतःप्रेरणेने निर्माण झालेली ही कविता रसिकांच्या मनाला प्रसन्नता प्राप्त करून देते. अमूर्तानुभवाला आकार देणारे हे देखणे अक्षरशिल्प आहे. त्यांचे काव्य लौकिकाच्या अतीत वेगळ्या सृष्टीत नेणारे आहे. हे डॉ. सोमनाथ कोमरपंत यांचे विधान रामाणींच्या कवितेचे सार यथार्थपणे व्यक्त करते.

## संदर्भ


१) रामाणी शंकर; दर्पणीचे दीप; मौज प्रकाशन गृह; पहिली आवृत्ती – नोव्हेंबर १९९२

२) डॉ. सोमनाथ कोमरपंत, संपादन : श्रीराम कामत; शंकर रामाणी; विश्वचरित्रकोश, खंड चार


■

# लेखक परिचय

- **डॉ. अनुजा जोशी**
  आयुर्वेदिक डॉक्टर
  प्रकाशित पुस्तके - 'उत्सव' व 'उन्हाचे घुमट खांद्यावर' हे दोन कवितासंग्रह आणि रामाणी : शंकर रामाणींची समग्र मराठी कविता हा संपादित ग्रंथ. महाराष्ट्र साहित्य परिषद - पुणे, कोकण महाराष्ट्र साहित्य परिषद - मुंबई अशा नामांकित संस्था तसेच कला अकादमी गोवा यांच्या राज्य साहित्य पुरस्काराने सन्मानित. १९९० नंतरच्या प्रातिनिधिक समग्र मराठी कवितेत व १९९० नंतरच्या प्रातिनिधीक मराठी स्त्री कवितेत समावेश.
  मु.पो. वाळपई, ता. सत्तरी - गोवा
  संपर्क : ७७२१८१०९८६

- **आश्लेषा महाजन**
  प्रकाशित ग्रंथ - कथासंग्रह, कविता, ललित, वैचारिक, कादंबरी, अनुवाद व बालसाहित्यासह एकूण ३० पुस्तके प्रकाशित.
  प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त.
  संपर्क : ९८६०३८७१२३

- **मंगेश नारायणराव काळे**
  व्यावसायिक चित्रकार.
  पाच कविता संग्रह, एक कलासमीक्षेचे व दोन संपादित पुस्तके प्रकाशित.
  'खेळ' या साहित्य व कलाविषयक अनियतकालिकाचे संपादक
  फ्लॅट नं. ९, सिल्व्हर स्प्रिंग सोसायटी, पंचवटी, पाषाण, पुणे ४११ ००८.
  संपर्क : ९७६६५९४१५४

- **सुनील शिनखेडे**
  आकाशवाणी सोलापूर केंद्राचे साहायक संचालक (सेवानिवृत्त)
  प्रकाशित ग्रंथ - कविता संग्रह (३), ललित गद्य (३), समीक्षा (१).
  विदर्भ साहित्य संघाच्या पुरस्कारासह एकूण चार पुरस्कार प्राप्त
  भ्रमणभाष : ९९७५२६५२९३

- **अरुण म्हात्रे**
  प्रकाशित ग्रंथ - २ कवितासंग्रहांसह एकूण पाच पुस्तके प्रकाशित
  बहिणाबाई पुरस्कारासह एकूण १३ पुरस्कार प्राप्त
  पत्ता : एम २, फ्लॅट १/२, साई छाया सोसायटी, कशिश पार्क, एल बी एस मार्ग, ठाणे (पश्चिम), ४००६०४
  भ्रमणभाष : ९७६९४०२५८२
  इमेल : arunaksharrediffmail.com

- **विनायक लक्ष्मण बापट**
  अध्यापक, गोवा विद्यापीठ
  प्रकाशित ग्रंथ - ललित गद्य (१), संपादन (१)
  पत्ता : सी-१, एफ-२ 'वज्रा' गृहसंकुल, गौळेभाट, चिंबल-गोवा ४०३००६
  भ्रमणभाष : ९७६४९७१२५३, ९४२३८३४५८५

- **श्रीकांत साहेबराव देशमुख**
  राज्य शासनाच्या सेवेत उच्च श्रेणी अधिकारी (सेवानिवृत्त)
  प्रकाशित ग्रंथ - कवितासंग्रह (४), ललित गद्य (२), वैचारिक (२), संपादन (३), कादंबरी (२), नाटकं (१) पुरस्कार - साहित्य अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका), महाराष्ट्र राज्य शासन यासह एकूण वीस पुरस्कार प्राप्त.
  पत्ता : 'बळीवंत' नरहर नगर, रिंग रोड, नांदेड ४३१६०५
  इमेल : shrikantdeshmukh63gmail.com
  संपर्क : ९४२२४३६७६९

- **अविनाश साळापुरीकर**
  मराठी नवदोत्तरतील एक महत्त्वाचे कवी. 'कुठल्याही विराम चिन्हाशिवाय व तुझं आहे उदंड प्रचंड उदंड आहे अखंड स्वागत' हे दोन कविता संग्रह. प्रिया जामकर यांची कविता हे समीक्षा संपादन. .पहिल्या कवितासंग्रहास राज्य पुरस्कार व महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार प्राप्त
  प्लॉट नं ५, गट नं १६७, विश्वजित सोसायटीच्या जवळ,
  म्हाडा कॉर्नर, सातारा परिसर, बीड बायपास,
  औरंगाबाद, पिन कोड ४३१०१०
  संपर्क : ९०२११२६४८११

- प्रा. स्नेहा अमोल मोरजकर
  साहायक प्राध्यापक भारतीय भाषा विभाग (मराठी)
  धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय मिरामार, गोवा ४०३००१
  संपर्क : ९९७५८३६००२


- प्रा. पूर्वा पंडित वस्त
  साहायक प्राध्यापक मराठी अध्ययन
  शाखा गोवा विद्यापीठ, तळगाव - गोवा. ४०३२०६
  संपर्क : ८४१२८६७५५७

- डॉ. विनय मडगांवकर
  साहायक प्राध्यापक, मराठी अध्ययन
  शाखा गोवा विद्यापीठ, ताळगांव-गोवा ४०३२०६
  संपर्क : ८३०८४७७६६४

- प्रा. स्नेहा संभाजी जांबोटकर
  साहायक प्राध्यापक, भारतीय भाषा विभाग (मराठी)
  धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय मिरामार, गोवा ४०३००१
  संपर्क : ८४११८७१५३४

- चिन्मय मधू घैसास
  साहायक प्राध्यापक, गोवा विद्यापीठ ताळगांव-गोवा. ४०३२०६
  https://goo.gl/maps/D8nRSNKxqnpatT9W-
  संपर्क (कार्यालय) : (+९१) ७०३०६९११४९
  https://www.unigoa.ac.in/faculty/chinmay-madhu-ghaisas.html
  प्रकाशित ग्रंथ - ललित गद्य (१), अनुवाद (१)
  साहित्य मंडळ ठाणे, मुंबई संस्थेचा सावित्रीबाई फुलेसाहित्यभूषण पुरस्कारासह एकूण आठ पुरस्कार प्राप्त
  संपर्क : ९८२३७२८६४०

- प्रा. राधिका राजेंद्र नागवेकर
  सहायक प्राध्यापक भारतीय भाषा विभाग (मराठी)
  धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय मिरामार, गोवा ४०३००१
  संपर्क : ८३०८९९०२३५



मेंदीरंगल्या मातीत हिर्वी धरतीची गाणी
बावलेल्या ओंजळीत थोडे ऊन, थोडे पाणी...



फिक्या जांभुळल्या जळी भुऱ्या क्षितिजाची भूल
जागवावी किनाऱ्याने शुभ्र मोतिया चाहूल...